दैनिक जनसत्य

## न्यूज लाईन

# रोख रकमेसह सोने चांदीचे दागिने महिलेस केले सुपुद

**कुर्डूवाडी :** पुणे ते दौंड असा उद्यान एक्सप्रेस या रेल्वेने प्रवास करीत असताना रोख रक्कम तसेच सोन्याचे दागिने असलेली पर्स विसरून महिला दौंड रेल्वे स्थानकावर उतरली.



गयाबाई कदम या महिला पुणे रेल्वे स्थानकावरून उद्यान एक्सप्रेसने एस.८ या क्रमांकाच्या डब्यात दौंड येथे जाण्यासाठी निघाल्या त्यांच्या सोबत ३ लहान नातवंडे असल्यामुळे घाईगडबडीत त्या सीटवरच पर्स विसरून दौंड रेल्वे स्थानकावर उतरल्या. काही वेळाने त्यांना पर्स ट्रेनमध्येच राहिली असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी दौंड येथील लोहमार्ग पोलिसांना घटना सांगितली. पोलिसांनी तातडीने सविस्तर माहिती कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिस ठाण्याला फोनद्वारे कळविले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, कुर्डूवाडी लोहमार्ग स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्रीमती संगिता हत्ती यांच्या मार्गदर्शनाखाली,पोलिसांनी स्टेशनवर पो.कॉ. नवनाथ सावंत, काजल सुतार व आरपीएफचे जवान पाखरे यांनी सदर पर्सचा शोध घेऊन, त्या महिलेच्या शेजारी बसलेल्या प्रवाश्यांच्या साक्षीने व सदरील महिलेस फोनवर पर्समध्ये असलेल्या वस्तूंबाबत मोबाईलद्वारे व्हिडिओ शुटींग करीत खातरजमा करून, ताब्यात घेतली. सदर पर्समध्ये रोख १० हजार रूपये,सोन्या चांदीचे दागिने व इतर वस्तू होत्या. प्रवासी गयाबाई कदम यांना पर्स देण्याकरीता नुकत्याच पोलिस भरती झालेल्या वट्रेनिंग करून आलेल्या महिला पोलिस कॉन्सटेबल काजल सुतार यांनी स्वतः दौंड येथे जाऊन सर्व सामानासह पर्स ताब्यात दिली.

W-app 9850141355

Main Edition
Apr 24, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com